अहवाल क्रमांक :१३६

पंचायती राज समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या रायगड जिल्हा परिषदेच्या सन २००४-२००५ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत

अकरावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २० डिसेंबर, २०१२ रोजी विधानसभेस/ विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०१२

पंचायती राज समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या रायगड जिल्हा परिषदेच्या सन २००४-२००५ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत

अकरावा अहवाल

(तीन)

पंचायती राज समिती

(सन २०१२-२०१३)

(३१ ऑक्टोबर, २०१२)

समिती प्रमुख

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स.

सदस्य

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५. श्री.विजय खडसे, वि.स.स.

६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

७. श्री.दिलीप माने, वि.स.स.

८. श्री.भारत भालके, वि.स.स.

९. श्री.उदय सामंत, वि.स.स.

१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

११. श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.

१३. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

१४. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

१५. श्री.जयकुमार रावल, वि.स.स.

१६. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

१७. श्री.संजय (बंडू) जाधव, वि.स.स.

१८. श्री.संजय राठोड, वि.स.स.

१९. श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

२०. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.

२१. श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

(चार)

२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.

२३. श्री.दिपक साळुंखे, वि.प.स.

२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

२५. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

निमंत्रीत

२६. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव
श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी

सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली व श्रीमती उषा दराडे, वि.प.स. यांच्या रिक्त झालेल्या जागांवर श्री.एम.एम.शेख, वि.प.स. व श्री.दिपक साळुंखे, वि.प.स. यांची दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी पंचायती राज समितीचे समिती सदस्य म्हणून मा.सभापती, विधानपरिषद यांनी नामनियुक्ती केली आहे.

(पाच)

पंचायती राज समिती

(सन २०१२-२०१३)

(३१ मे, २०१२)

समिती प्रमुख

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स.

सदस्य

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५. श्री.विजय खडसे, वि.स.स.

६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

७. श्री.दिलीप माने, वि.स.स.

८. श्री.भारत भालके, वि.स.स.

९. श्री.उदय सामंत, वि.स.स.

१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

११. श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.

१३. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

१४. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

१५. श्री.जयकुमार रावल, वि.स.स.

१६. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

१७. श्री.संजय (बंडू) जाधव, वि.स.स.

१८. श्री.संजय राठोड, वि.स.स.

१९. श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

२०. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.

२१. रिक्त

(सहा)

२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.

२३. रिक्त

२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

२५. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

निमंत्रीत

२६. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव
श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी

सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली, वि.प.स. व श्रीमती उषा दराडे, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१२ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे पदे रिक्त आहेत.

(सात)

पंचायती राज समिती
(२०१०-२०११)
(दिनांक ४ मार्च, २०१०)

समिती प्रमुख

१ श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

समिती सदस्य

२ ॲड, के.सी.पाडवी, वि.स.स.

३ श्री. माधवराव पवार, वि.स.स.

४ श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

५ श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

६ श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

७ श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

८ श्री. बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

९ श्री. उदय सामंत, वि.स.स.

१० श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

११ श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

१२ श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१३ श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

१४ श्री. सुरेश खाडे, वि.स.स

१५ श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

१६ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१७ श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

१८ श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१९ श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

२० श्री. नितीन भोसले, वि.स.स.

(आठ)

२१ प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

२२ श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२३ ॲड. उषा दराडे, वि.प.स.

२४ श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

२५ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव,
श्री.प्र.स.मयेकर, कक्ष अधिकारी,

(नऊ)

प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा अकरावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१२-२०१३ करिता समिती दिनांक ३१ मे, २०१२ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००४-२००५ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सन २०१०-२०११ साठी गठीत झालेल्या समितीने रायगड जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली.

समितीने रायगड जिल्हा परिषदेस दिनांक ५, ६ व ७ मार्च, २०१२ रोजी भेट देऊन श्री.अभिजित बांगर, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.ल.मा.पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, रायगड जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २०१२-२०१३ करिता गठीत झालेल्या समितीने रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्याबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२ रोजी जिल्हा परिषद, रायगड संदर्भात मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या/प्रतिनिधीच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी अप्पर मुख्य सचिव, (मदत कार्य व पुनर्वसन) अतिरिक्त कार्याभार, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, प्रधान सचिव, वने, प्रधान सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, दुग्धविकास विभाग, प्रधान सचिव, अदिवासी विभाग, प्रधान सचिव महिला व बालकल्याण विभाग, प्रधान सचिव, रोजगार हमी योजना व जलसंधारण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव, पर्यावरण विभाग, उप सचिव आणि संचालक पाणी पुरवठा विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रायगड, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, डीडीएसएस, सार्वजनिक आरोग्य विभाग, सह संचालक, रा.ग्रा.आ.अ. मुंबई, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रायगड, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

(दहा)

लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या रायगड जिल्हा परिषदेच्या कामकाजांची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत..

सन २०१२-२०१३ साठी गठीत झालेल्या समितीने दिनांक १७ डिसेंबर, २०१२ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

विधान भवन :
नागपूर,
दिनांक :१७ डिसेंबर, २०१२

चंद्रकांत दानवे,
समिती प्रमुख,
पंचायती राज
समिती

(अकरा)

अनुक्रमणिका

अ.क्र.	प्रकरण क्रमांक	विषय	परिच्छेद क्रमांक	पृष्ठ क्रमांक
१	एक	**टी.सी.एल.** खरेदीमधील अनियमितता	३.१	१
२	दोन	आदिवासी जमाती घरकुल योजनेतील अनियमितता	३.२	७
		प्रकरण तीन		
३	तीन	ड्युअ`ल डेस्क खरेदीबाबत	३.८	१३
४	चार	अनुदान खर्चास मंजूरी नसताना गणवेश कापड व शिलाईसाठी खर्च केल्याबाबत	३.३९	२१
५	पाच	वारक, कशेडी रस्ता दुरुस्त कमातील अनियमितता	३.१०४	२९
६	सहा	वडाची वाडी, पाझर तलाव बांधणे	३.२५५	३३
		परिशिष्ट		
		समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त		३९

प्रकरण एक

रायगड जिल्हा परिषद

१.१ टी. सी. एल. खरेदीमधील अनियमितता :- (परिच्छेद क्रमांक ३.१)

सन २००४-२००५ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्र.२०) जिल्हा परिषद, रायगड यांनी मे.ठक्कर इन ऑरगॅनिकल प्रा.लि.मुंबई यांचे कमी दराचे निविदेनुसार प्रती किलो १३.९० रुपये दराने २२६७९ किलो ग्रॅम टी.सी.एल. पावडर खरेदीसाठी रुपये ३,१५,२३८ खर्च केला आहे

याबाबत **खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत :-**

१. पावसाळ्यातील टी.सी.एल.ची आवश्यकता विचारात घेता निविदा प्रसिध्दीची कार्यवाही पावसाळ्यापूर्वी करणे आवश्यक असताना विलंबाने जुलै, २००४ मध्ये निविदा प्रक्रिया का सुरु केली याचा खुलास करण्यात यावा.

२. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस/१०८८/(२५१२)/उद्योग-६, दिनांक २ जानेवारी, १९९२ मधील उप परिच्छेद ८.३ (अ) नुसार निविदा प्रसिध्द झाल्यानंतर निविदा भरण्यासाठी पुरवठादाराना किमान तीन आठवड्याचा कालावधी देणे आवश्यक असताना दिनांक १३ जुलै, २००४ रोजी प्रसिध्दी देऊन २३ जुलै, २००४ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे शासन आदेशाचे उल्लंघन झाले आहे.

३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी पुरवठा आदेश क्रमांक राजिप/साप्रशा/व्हीपी/१८९७/२/२००४ दिनांक २१ ऑगस्ट, २००४ अन्वये १५ पंचायत समितींना २० दिवसात टी.सी.एल. पुरवठा करणेबाबत सुचित केले होते व विहित मुदतीत पुरवठा न केल्यास निविदेतील अटी/शर्ती नुसार ५ टक्के दंड आकारण्यात येईल असे नमूद केले हाते. प्रत्यक्षात १५ गटांना २१ ऑक्टोबर, २००४ ते ६ नोव्हेंबर, २००४ या कालावधीत म्हणजे जवळपास दोन महिने विलंबाने पावडराचा पुरवठा केला आहे. त्यामुळे ५ टक्के दंड म्हणून रक्कम रुपये १०,४११/- वसूल होणे आवश्यक होते. तरी दंड रक्कम १०,४११/- पुरवठादाराकडून वसूल करुन शासन निधीत जमा करण्या यावी.

४. शासन निर्णय पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग क्रमाक टी.सी.एल./११०४/प्र.क्रमांक ३५/पा.पु.०८, दिनांक २५ ऑक्टोबर, २००४ अन्वये सन २००४-२००५ या वर्षात ग्रामपंचायतीना टी.सी.एल. पावडरसाठी ३० टक्के अनुदान मंजूर केले असल्याने ग्रामपंचायतीकडून ७० टक्के रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. सबब एकूण खरेदी ३,१५,२३८ चे ७० टक्के रक्कम रुपये २,२०,६६७ ग्रामपंचायतीकडून वसूल करणे आवश्यक असता १,०८,६७० वसूल केल्याचे नोंदवही वरुन दिसते उर्वरित रक्कम रुपये १,११,९९७ वसूल करणे आवश्यक आहे.

५. अखर्चित रक्कम रुपये २,४०,००० शासन निधीत योग्य शिर्षाखाली जमा करणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.

१. शासन निर्णय क्र.११.४/प्र.क्र.३५/पापु०८/दि.६ मे, २००४ अन्वये टी.सी.एल. पावडरसाठी रक्कम रु.२.१३ लाख अनुदान मंजूर केले होते. शासनाचे सदर आदेश कार्यालयास जून, २००४ मध्ये प्राप्त झाल्यामुळे निविदा प्रक्रिया सुरु करणेस विलंब झाला आहे. जिल्हा परिषद स्तरावरुन नविदा प्रक्रियेसाठी दि. १३ जुलै, २००४ रोजी प्रसिध्दी देणेत आली आहे.

२. जिल्हा परिषदेकडून टी.सी.एल. खरेदी करणेसाठी मे.संपादक दैनिक कृषिवल, दै.सागर व साप्ताहिक कोकणकडा या वृत्तपत्रांकडे निविदा सुचना दि.१२/७/२००४ रोजी प्रसिध्दीसाठी देण्यात आल्या होत्या. तसेच पावसाळा सुरु झाला असल्यामुळे व पाणी शुध्दीकरणासाठी टी.सी.एल.ची तातडीने आवश्यकता असल्याने निविदा मध्ये १० दिवसाचा कालावधी देणेत आलेला आहे.

३. या कार्यालयाचे आदेश क्र.राजिप/साप्रशा/व्हपी२/२००४ दि.२७/०८/२००७ अन्वये एकूण १५ पंचायत समितींना २० दिवसांचे आत टी.सी.एल. पावडर पुरवठा करणेबाबत सुचित केले होते. विहित मुदतीत पुरवठा केल्याने निविदेतील अटी व शर्ती नुसार बिलाच्या ५ टक्के दंड रक्कम रु.१०,४११/- पुरवठादाराकडून वसूल करुन शासन निधीत चलन क्र.४३३२८ दि.१७/०३/२००६ अन्वये भरणा केले आहेत.

४. सन २००४-२००५ या वर्षात ग्रामपंचायतींना वाटप केलेल्या टी.सी.एल. पावडरची वसूल करणेची रक्कम रु.१,११,९९७/- पूर्णपणे वसूल केलेली आहे.

५. अखर्चित रक्कम रुपये २,४०,०००/- शासन निधीत योग्य शिर्षाखाली जमा करणेत आली आहे.

१.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, रायगड यांची दिनांक ०५ मार्च, २०१२ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, टी.सी.एल. पावडर खरेदीच्या संदर्भात निविदा प्रसिध्दीची कार्यवाही पावसाळ्यापूर्वी करणे आवश्यक असताना विलंबाने म्हणजे जुलै, २००४ मध्ये निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. निविदा प्रसिध्द झाल्यानंतर निविदा भरण्यासाठी पुरवठादारांना किमान तीन आवठड्याचा कालावधी देणे आवश्यक असताना पुरवठादारांना १० दिवसांचाच कालावधी देण्यात आलेला आहे. त्यामुळे निविदा प्रक्रिया विलंबाने सुरु का करण्यात आली तसेच मुदत कमी करण्यासाठी संबंधितांची परवानगी घेण्यात आली होती का आणि वर्तमानपत्रात जाहिरात देण्यासंदर्भात जे वर्तमानपत्र संपुर्ण महाराष्ट्रात म्हणजेच जास्तीत जास्त लोकांपर्यंत जाते अशा वर्तमानपत्रात जाहिरात निविदा का देण्यात आल्या नाहीत, ठेकेदाराने दोन महिने विलंबाने टी.सी.एल. पावडराचा पुरवठा केल्याने सदरचा विलंब कोणाकडून झाला, दंडाची रक्कम दोन वर्षे उशिराने वसुल का करण्यात आली या संदर्भात संबंधितांवर कोणती कारवाई केली अशी समितीतर्फे विचारणा केली असता मुख्या कार्यकारी अधिकारी यांनी समितीला सांगितले की, टी.सी.एल. पावडर खरेदीच्या संदर्भात शासनाचे आदेश जिल्हा परिषद कार्यालयास

जून, २००४ मध्ये प्राप्त झाले होते. त्यानंतर जिल्हा परिषद स्तरावरुन दिनांक १३ जुलै, २००४ रोजी निविदा प्रक्रियेसाठी प्रसिध्दी देण्यात आलेली आहे. पावसाळा सुरु झालेला असल्यामुळे रोगराई पसरु नये म्हणून पाणी शुध्दीकरणासाठी टी.सी.एल. पावडर खरेदीची निविदा लवकर प्रसिध्द करणे आवश्यक होते. निविदा प्रक्रियेसाठी विहित पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. टी.सी.एल. पावडरचा वेळेत पुरवठा न केल्यामुळे संबंधित ठेकेदाराकडून ५ टक्के दंडाची रक्कम वसूल करुन ती शासन निधीत जमा करण्यात आलेली आहे. त्यावर समितीने अशी विचारणी केली की, वर्तमानपत्रात जाहिरात देताना ज्या वर्तमानपत्राचे सर्क्युलेशन संपूर्ण महाराष्ट्रात आहे अशा वर्तमानपत्रामध्ये जाहिरात घ्यावयास पाहिजे होती. परंतु दैनिक कृषिवल, दैनिक सागर व साप्ताहिक कोकणकडा या स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहिरात दिलेली आहे. वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देताना नियमाचे उल्लंघन झालेले आहे. ठेकेदाराकडून दिनांक १७/३/२००६ रोजी म्हणजे दोन वर्षांनी दंडाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. ठेकेदाराकडून दंडाच्या रकमेवारील दोन वर्षाचे व्याज वसूल करण्यात आलेले आहे काय, ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्यात आले आहे काय अशी समितीने विचारणा केली असता तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुरवठादाराकडून दंड वसुल केला असून व्याजाची रक्कम वसुल करण्यात आली नाही तसेच टी.सी.एल. पावडरचा पुरवठा विलंबाने झाल्याचे मान्य केले तर पुरवठादाराला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगिले. तथापि, इतर मुद्यांचा खुलासा करण्यात आला नाही.

विभागीय सचिवांची साक्ष :-

समितीला प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२ रोजी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, टी.सी.एल.खरेदी प्रकरणी आयुक्तांची परवानगी घेणे बंधकारक आहे किंवा कसे, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांनी समितीला अशी माहिती दिली की, टी.सी.एल. खरेदी करणेबाबत दरवर्षी शासन स्तरावरुन दरकरार निश्चित होत असतो. सन २००४-२००५ मध्ये निश्चित केलेल्या दरकराराची माहिती पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी अवधी लागणार होता, त्यामुळे जिल्हा परिषदेच्या पातळीवर तातडीची गरज म्हणून तसेच ती जीवनावश्यक बाब असल्यामुळे अल्प मुदतीच्या निविदेद्वारे टी.सी.एल. ची खरेदी केली. या निविदेला विभागीय आयुक्तांची परवानगी घेणे आवश्यक होते. परंतु टी.सी.एल. पावडर खरेदीची बाब तातडीची व जीवनावश्यक होती म्हणून त्यावेळी आयुक्तांची परवानगी घेण्यात आली नाही असे समितीस विदित केले. ठेकेदाराने पावडरचा वेळेवर पुरवठा केला नसल्यामुळे व्याजासह दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे काय, तसेच ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्यात आले आहे काय, कमी कालावधीची निविदा काढून शासनाच्या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे, अशी समितीने विचारणा केली असता त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला असे सांगितले की, सदरहू ठेकेदारास टी.सी.एल.चा पुरवठा करण्याबाबतचे आदेश दिनांक २२/७/२००४ रोजी देण्यात आले होते. त्याने टी.सी.एल.चा पुरवठा वेळेवर केला नाही म्हणून त्याच्याकडून ५ टक्के दंडाची रक्कम वसूल केलेली असून ठेकेदारास

काळ्या यादीत टाकण्याचे कबूल केले, तसेच प्रधान सचिव, रोजगार हमी योजना व जलसंधारण विभाग यांनी समितीला अशी माहिती दिली की, तातडीची बाब असेल तर अशी खरेदी करता येते. त्यांनी सदर खरेदी बाबत शासनास नंतर कळवावयास पाहिजे होते. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ही बाब आता शासनास कळवून त्यास मान्यता घेऊ असे सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :-

पावसाळयात ग्रामिण भागात अशुध्द पाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असते यासाठी शासनाकडून पाण्यात मिसळण्यासाठी टी.सी.एल पावडरचा पुरवठा करण्यात येतो. अशुध्द पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने अनेक प्रकारचे रोग उद्‌भवतात. टी.सी.एल. पावडर खरेदीची निविदा विहीत कावाधीत न काढल्यामुळे स्पर्धात्मक निविदेचा फायदा घेता आला नाही, तसेच आवश्यक असणारी टी.सी.एल. पावडरचा पुरवठा वेळेत झाला नसल्याने ग्रामिण भागातील जनतेला अशुध्द पाणी प्यावे लागले, सदरची बाब गंभीर असुन संबंधित अधिकाऱ्यांचा यामध्ये निष्काळजीपणा दिसुन येतो. करारनाम्यात ठेकेदाराला ५ टक्के दंड करणे एवढेच नमूद करुन व्याजासह रक्कमेची वसुली करणे याचा समावेश होणे आवश्यक होते. ठेकेदाराला काळ्या यादीत टाकणे आवश्यक असताना ठेकेदारावर अशा प्रकारची कारवाई न करता हेतूपूर्वक मेहरनजर दाखविण्यात आल्याचे दिसुन येते.

ग्रामिण जनतेला पावसाळयात पिण्याचे पाणी शुध्द मिळावे म्हणून पाण्यात टाकण्यासाठी पावसाळा सुरु होणापूर्वी टी.सी.एल. पावडरची खरेदी न करणे, अल्प मुदतीची निविदा काढल्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ न होणे, खरेदीबाबतची निविदा राज्यव्यापी वृत्तपत्रांऐवजी केवळ स्थानिक वृत्तपत्रांतमध्येच देणे, ठेकेदाराने जवळपास दोन महिने विलंबाने पुरवठा करणे, तथापि अद्यापही त्यास काळ्या यादीत न टाकणे इत्यादि अनेक गंभीर बाबी समितीच्या निदर्शनास आलेल्या आहेत. उक्त बाबींमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना दूषित पाण्यामुळे होणाऱ्या गंभीर आजारापासून रक्षण होण्यासाठी शासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या सदर योजनेच्या मुळ उद्देशालाच बाधा पोहोचलेली असे समितीचे स्पष्ट मत आहे. सबब, इत:पर अशाप्रकारे अल्प मुदतीची निविदा प्रसिध्द करुन स्पर्धात्मक दराचा लाभ न घेता केवळ टी.सी.एल. पावडर ही जीवनावश्यक बाबीशी निगडीत असल्याचे तसेच अवधी कमी असल्याचे कारण देऊन केलेली चूक दडपून टाकण्याचा केविलवाणा प्रयत्न करुन याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला आहे. सबब, याप्रकरणी सखोल चौकशी करुन जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कारवाई करावी व त्याबाबतची माहिती समितीला ३ महिन्यात कळविण्यात यावी. अशी समितीची शिफारस आहे.

२.१ आदिवासी जमाती घरकुल योजनेतील अनियमितता :- (परिच्छेद क्रमांक ३.२)

जिल्हा परिषद, रायगड, सन २००४-०५ (परिच्छेद क्र. २२) प्रकल्प अधिकरी एकात्मिक आदिवासी विभाग, प्रकल्प, पेण, जिल्हा रायगड यांचे पत्र क्र. ३ विकेस/२००४/प्र.क्र.६४/का-३/३१२, दिनांक

१ फेब्रुवारी, २००५ अन्वये आदिम जमातीकरिता घरकुल योजनेतील प्रती लाभार्थी ३०,०००/- रुपये प्रमाणे सन २००५-०६ साठी ४६२ व २००४-०५ साठी २३६ याप्रमाणे ६९८ लाभार्थींसाठी २,०९,४०,००० तरतूद उपलब्ध करुन दिली आहे. त्यानुसार उपरोक्त प्रमाणकान्वये प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांचे पत्र ३ विकेस/२००५/प्र.क्र.६४/का-३, दिनांक २ मार्च, २००५ अन्वये १३ तालुक्यांना घरकुल मंजूर यादीप्रमाणे २,०९,४०,०००/- रुपयांचे अनुदान वाटप केले आहे.

याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत

१. एकूण ६९८ लाभार्थ्यांची कामे दिनांक ३१ मार्च, २००५ पूर्वी करणेस कालावधी अपुरा असल्याने प्रकल्प अधिकारी, पेण यांनी दिनांक १९ मार्च, २००५ च्या पत्रान्वये सदरची कामे दिलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून तात्काळ पूर्ण करण्याच्या अटीवर सन २००५-०६ मध्ये खर्च करण्यास अनुमती दिली आहे. त्याप्रमाणे कामे पूर्ण झाल्याची व उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नाहीत

२. पंचायत समिती, पनवेल अंतर्गत २१ लाभार्थींना अन्य योजनेतून लाभ दिला असल्याने नवीन लाभार्थींची नावे पाठविण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार पूर्तता केल्याचे आढळून आले नाही.

३. खालापूर गटाकडील १२ लाभार्थींना अन्य योजनेतून लाभ दिला असल्याने व लाभार्थींची नावे दारिद्र्यरेषेखालील यादीत समाविष्ट नसल्याने मंजूर यादीतून रद्द करण्याबाबत कळविले आहे.

४. पेण गटाकडील २३ लाभार्थी दारिद्र्यरेषेखालील यादीत समाविष्ट नसल्याने तसेच अन्य समाजाचे असल्याने अपात्र ठरविले आहेत. तसेच २० लाभार्थी पेण अंतर्गत ग्रामपंचायत हद्दीत आढळून येत नाहीत.

५. सद्यःस्थितीत किती कामे पूर्ण झाली. किती प्रगतिपथावर आहेत याबाबतचा अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांना पाठविण्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.

१. प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विभाग प्रकल्प, पेण यांनी त्यांचे पत्र क्र./विकेस/२००४/प्र.क्र.६४/का३/दि.२/३/२००५ अन्वये ६९८ लाभार्थींना रक्कम रु.३०,०००/- प्रमाणे एकूण रक्कम रु.२,०९,४०,०००/- मंजूर केले होते. तसेच प्रकल्प अधिकारी यांचे कार्यालयाकडील पत्र क्र./विकेस०६/प्रक./कात-३/२६१४ दि.२७/९/२००६ अन्वये सन २००५-२००६ मध्ये सदरची रक्कम खर्च करणेस अनुमती दिली होती त्याप्रमाणे झालेल्या कामाची उपयोगिता प्रमाणपत्र या कर्यालयाचे पत्र क्र.१५८१ दि.३०/०९/२००५ अन्वये मा. आयुक्त आदिवासी विकास विभाग ठाणे व प्रकल्प अधिकारी पेण यांचेकडे सादर केलेले आहे.

२. पंचायत समिती पनवेल अंतर्गत २१ लाभार्थ्यांना अन्य योजनेतून लाभ दिला असल्याचे सदरचे लाभार्थी रद्द करुन प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास पेण यांनी त्यांचेकडील पत्र

क्र.आदीम/घरकुल/प्र.क.६४/का-३/दि.८/०६/२००५ अन्वये नवीन ३१ लाभार्थ्यांना मंजूरी दिलेली आहे व सदरची कामे पूर्ण झालेली आहेत.

३. पंचायत समिती खालापूर अंतर्गत १२ लाभार्थ्यांना अन्य योजनेतून लाभ दिला असल्याने सदरचे लाभार्थी रद्द करुन प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास पेण यांनी त्यांचेकडील पत्र क्र.आदीम/घरकुल/प्र.क्र.६४/का-३/३०८३/दि.२२/१२/२००५ अन्वये नवीन १२ लाभार्थ्यांना मंजूरी दिलेली आहे व सदरची कामे पूर्ण झालेली आहेत.

४. पंचायत समती पेण अंतर्गत २३+२० असे एकूण ४३ लाभार्थी रद्द करुन प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास पेण यांनी त्यांचेकडील पत्र क्र. आदीम/घरकुल २००५/प्र.क्र.६४/का-३/१६११/दि.२४/०५/२००५ अन्वये नवीन ४३ लाभार्थ्यांना मंजूरी दिलेली आहे व सदरची कामे पूर्ण झालेली आहेत.

५. सद्यःस्थितीत एकूण ६९८ घरकुलाची कामे पूर्ण झाली असून या कार्यालयाचे पत्र राजिप/साप्रशा/व्हीपी-२/२००/२१४५/२००८ दि.१५/७/२००८ अन्वये आदिवासी विकास विभाग नाशिक यांना उपयोगिता प्रमाणपत्र पाठविलेले आहे.

२.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

समितीने जिल्हा परिषदेला दिनांक ५ मार्च, २०१२ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी झालेल्या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांची घेतलेल्या साक्षीत लेखा परिक्षकांनी घेतलेल्या गंभीर आक्षेपासंदर्भात पेण गटाकडील २३ लाभार्थी दारिद्र्यरेषेखालील यादीत समाविष्ट नसल्याने त्याठिकाणी अन्य समाजाच्या अपात्र लाभार्थ्यांची नावे यादीत समाविष्ट केली तसेच २० लाभार्थी पेण ग्रामपंचायतीच्या हद्दीत नसल्याचे आढळून आल्याने यासंदर्भात कोणती कारवाई करण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता लाभार्थी यादी प्राप्त झाल्यानंतर लाभ देतांना पात्र लाभार्थ्यांची खात्री करुन घेण्यात येते. तसेच सदरची यादी प्रकल्प कार्यालय आदिवासी प्रकल्प पेण यांचेकडून प्राप्त झाली असून लाभार्थ्यांच्या यादीची पडताळणी केल्यानंतर २३ लाभार्थी दारिद्र्यरेषेखालील नसल्याचे आणि २० लाभार्थी गावातील स्थानिक नसल्याचे आढळून आले व तसे प्रकल्प कार्यालयास कळविण्यात आले असे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले. प्रकल्प कार्यालयाने यादी तयार करताना अपात्र लाभार्थ्यांचा यादीमध्ये समावेश का केला तसेच या संदर्भात पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता त्यासंदर्भात समितीला उत्तर देण्यात आले नाही.

२.३ विभागीय सचिवांची साक्ष :-

रायगड जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने समितीने दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या झालेल्या साक्षीच्या वेळी समितीने अपात्र लाभार्थ्यांची नावे यादीमध्ये असल्याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय असल्यास त्यांचे विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली व नसल्यास त्याची कारणे काय आहेत

तसेच सादर केलेल्या माहितीमध्ये आणि जिल्हा बैठकीच्या वेळी देण्यात आलेली माहिती यामध्ये तफावत आहे ज्या अधिकाऱ्यांनी समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला त्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता त्यावर प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवास प्रकल्प, पेण यांचेकडून आदिम जमाती घरकूल योजनेंतर्गत पेण गटास १०९ लाभार्थ्यांची निवड करुन घरकुलासंबंधी अनुदान प्राप्त झाले होते. प्राप्त झालेल्या यादीतील २३ लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील नसल्याचे तसेच ते अन्य समाजाचे असल्याने अपात्र ठरविले व २० लाभार्थी पेण अंतर्गत ग्रामपंचायत हद्दीतील आढळून आले नाही असे एकूण ४३ लाभार्थी अपात्र ठरविले अशा प्रकारची माहिती देण्यात आली होती, परंतु यात वस्तुस्थिती अशी आहे की, दारिद्र्य रेषेखालील नसलेले ७, यापूर्वी लाभ घेतलेले १३, ग्रामपंचायत हद्दीमध्ये आढळून न आलेले २० व आदिम जमाती प्रवर्ग वगळून अन्य समाजाचे ३ असे एकूण ४३ लाभार्थी अपात्र आढळून आले होते. त्या लाभार्थ्यांना अपात्र ठरवून त्यांच्या ऐवजी आदिम जमाती प्रवर्गतील अन्य लाभाथ्यांर्ची निवड करुन त्यांना घरकूल योजनेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच आदिम जमातीतील घरकूल योजना संदर्भातील लाभार्थ्यांची निवड यादी आदिवासी विकास विभागाकडून प्राप्त होत असते. तसेच सदरच्या यादीस प्रकल्प अधिकारी जबाबदार असून त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात येईल व त्यासंबंधीचा अहवाल समितीस आठ दिवसांत सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

२.४ अभिप्राय व शिफाशी :-

प्रकल्प **अधिकारी एकात्मिक आदिवासी विभाग प्रकल्प पेण जिल्हा रायगड यांनी आदिम जमातीकरिता एकूण ६९८ लाभार्थ्यांसाठी राबविलेल्या घरकूल योजनेत घरकुलांची कामे पूर्ण झाल्यावर लेखापरिक्षकांना उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध करुन न देता उशिराने आयुक्त आदिवासी विकास विभाग, ठाणे व प्रकल्प अधिकारी, पेण यांचेकडे सादर करण्यात आले. तसेच बोगस लाभार्थ्यांसंदर्भात जिल्हा बैठकीच्या वेळी देण्यात आलेली माहिती व विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी देण्यात आलेली माहिती यामध्ये मोठ्या प्रमाणात विसंगती दिसून आली, यासंदर्भात प्रकल्प अधिकारी यांनी तयार केलेल्या लाभार्थ्यांच्या यादीमध्ये दारिद्र्य रेषेखालील नसलेले ७, अन्य समाजाचे ३, गावात न राहणारे २० तसेच यापूर्वी लाभ घेतलेले १३ असे एकूण ४३ अपात्र लाभार्थ्यांची नावे सदरच्या यादीमध्ये सामविष्ट करण्यात आली. सदरच्या यादीत बोगस नावे घुसविणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात आली नाही. लाभार्थ्यांची यादी तयार करताना प्राथमिक पातळीवर लाभार्थ्यांकडून सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करुनच यादी तयार करणे आवश्यक आहे. तथापि, संबंधितांनी या गोष्टीकडे हेतुपूर्वक डोळेझाक केली आहे. समितीला या संदर्भात अनियमितता झाली असल्याचे दिसून आली आहे.**

प्रकल्प अधिकाऱ्यांनी घरकुल योजनेची लाभार्थ्यांची यादी तयार करताना स्वहित लक्षात घेऊन हेतुपूर्वक अपात्र लाभार्थ्यांची नावे यादीत समाविष्ट केली आहेत. सदरची बोगस लाभार्थ्यांची यादी निदर्शनास आली नसती तर शासनाच्या निधीचा गैरवापर झाला असता व पात्र लाभार्थी सदर योजनपासून वंचित राहिले असते, तसेच संबंधित अधिकाऱ्याने अनियमितता केली असल्याने त्याचे विरुध्द कारवाई करुन समितीला माहिती देणे अपेक्षित असताना तसे न करता समितीने कारवाई करण्याचे निदेश दिल्यानंतर संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देण्यात

येईल असे समितीस सांगितले म्हणजेच त्याचेवर कारवाई करण्यास शासन टाळाटाळ करीत आहे असे समितीचे स्पष्ट मत झाले आहे. त्यामुळे समिती अशी शिफारस करते की, जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्या विरुध्द कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा.

प्रकरण तीन

३.१ ड्युअ`ल डेस्क खरेदी बाबत :-

परिच्छेद **क्रमांक ३.३८ :** जिल्हा परिषद रायगड सन २००४-२००५ (परिच्छेद क्रमांक २२)

११ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून स्केल ब्लाईंडनेस संस्थेकडून रु.१४,२१,८८०/- व दिपक इंडस्ट्रिज को.ऑप.सोसायटी मुंबई यांच्याकडून रु.१४,१९,४२०/- रुपयांचे ड्यूअल डेस्क खरेदी केलेले आहेत. त्याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१. डेस्क खरेदी पूर्वी महाराष्ट्र राज्य ग्रामिण विकास व जलसंधारण विभागाची मंजूरी घेणे आवश्यक असताना शिक्षण विभागाचे पत्र क्र. रा.जि.प./शिक्षण/वशी/लेखा/२/५५१८, दिनांक ०४ ऑक्टोबर,२००४ अन्वये खरेदी झाल्यानंतर कार्योत्तर मंजूरी घेण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

२. दोन्ही संस्थाचे दि.३० ऑगस्ट, २००४ रोजी देयके पारीत केल्यानंतर उपमुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षण अधिकारी यांनी दिनांक १३ सप्टेंबर, २००४ रोजी डेस्क नमुना तपासणी केली आहे. सर्व साहित्यांची तपासणी केल्यानंतरच देयक अदा करणे आवश्यक होते.

३. डेस्कची तपासणी तांत्रीक तज्ञांकडून करुन घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करताच डेस्क सागवानी लाकडा पासून व उत्कृष्ट बनावटीचे असणे बाबत कोणत्या आधारे खात्री केली याचा खुलासा करण्यात यावा.

४. संस्थेने दिनांक २८ जून, २००४ रोजी करारनामा केला असता लगेच खालापूर गटास दिनांक ३० जून, २००४ रोजी डेस्क पुरवठा कसा केला हे स्पष्ट करावे. यावरुन प्रत्यक्ष पुरवठा झालेला नसताना कागदोपत्री तारीख नमुद केल्याचे दिसते. प्रत्यक्ष पुरवठा कधी झाला हे स्पष्ट कारावे.

५. पोलादपूर गटातील ९ शाळांना ४३ डेस्क कसे वाटप केले याचा खुलासा करुन विद्यार्थी संख्येनुसार डेस्क वाटप बाबत स्पष्टीकरण करावे.

६. ज्या शाळांना डेस्क वाटप केले त्या शाळा कोणत्या निकषानुसार निवडल्या याचा खुलासा करण्यात यावा.

७. तालुका मास्तरांना वाटप केलेप्रमाणे शाळांनी डेस्कची नोंद जंगम मालमत्ता नोंदवही घेतलेबाबत उतारे घेतलेले नाहीत.

८. तालुका उप शिक्षणाधिकारी यांनी प्राप्त डेस्क नमुन्यानुसार असल्याबाबत दाखले दिलेले नसल्याने पुरवठा झालेल्या डेस्कच्या दर्जाबाबत खात्री न करताच रक्कम कशी अदा केली याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

९. शिक्षण विभागाने पत्र क्र. राजिप/शिक्षण/लेखा-२/५८२५/२००४दि.३० ऑगस्ट, २००५ अन्वये मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना सदर देयकाचे धनादेश संबधीत मक्तेदार यांना अदा करु नयेत असे कळविले आहे. यावरुन प्रत्यक्ष मालाचा पुरवठा व्यवस्थित केलेला नव्हता किंवा पुरवठा झालेला नव्हता हे स्पष्ट होते याबाबत समर्पक खुलासा होणे आवश्यक आहे.

१०. सदर खर्चाबाबत उपयोगिता दाखला निर्गमित करण्यात आलेला नाही. यावरुन सदर माल विहीत मुदतीत मिळला नसल्याचे स्पष्ट होत असून वेळेत प्राप्त न झालेल्या मालावर ५ टक्के प्रमाणे दंडाची रक्कम परिगणीत करुन वसुल करण्यात यावी.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला :-

१. विद्यार्थ्यांना बसण्यासाठी लवकरात लवकर डेस्क उपलब्ध व्हावेत याकरिता शासनाची पूर्व परवानगी न घेता पुरवठादारास दिनांक २४/६/२००४ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले होते. त्यांनतर दिनांक ४/१०/२००४ रोजी कार्योत्तर मंजूरी मागितली. शासनाने सदर खरेदीस त्याच आर्थिक वर्षात दिनांक १५/१०/२००४ रोजी मंजूरी दिलेली आहे.

२. सदर साहित्याची तपासणी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) शिक्षणाधिकारी (प्राथ) यांनी दिनांक २३/६/२००४ रोजी केलेली आहे. तपासणी केल्यानंतरच देयक अदा केलेले आहे.

३. डेस्कची तपासणी शिक्षणाधिकारी (प्राथ) आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) यांनी डेस्कची तपासणी केलेली असून सदर साहित्य पुरवठा आदेशाप्रमाणे असल्याची खात्री करुन घेण्यात आलेली आहे. डेस्कची खरेदी दरकरारानुसार करण्यात आलेली आहे.

४. तालुका मास्तर खालापूर यांना डेस्कचा पुरवठा दिनांक ३०/६/२००४ रोजी केला नसून तो दिनांक ३०/७/२००४ रोजी केलेला आहे.

५. शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान विद्यार्थी संख्येच्या मानाने कमी प्राप्त झाल्याने प्रत्येक शाळेला विद्यार्थी संख्येनुसार डेस्कचे वाटप करता आलेले नाही.

६. डेस्कचा पुरवठा अत्यंत अल्प असल्यामुळे प्राधान्याने उच्च प्राथमिक शाळांना पुरविणेत आलेले आहेत.

७. तालुका मास्तर यांनी शाळांना केलेल्या वाटपाची साठा नोंदवहीत नोंद आहे.

८. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) व शिक्षणाधिकर (प्राथ) यांनी प्राप्त डेस्क नमुन्यानुसार असल्याबाबत खात्री केल्यानंतर डेस्क तालुका मास्तर यांच्या ताब्यात देण्यात आले व त्याप्रमाणे रक्कम देण्यात आली.

९. पुरवठादाराने नमुन्याप्रमाणे तालुक्यांना डेस्क पुरविण्याची खात्री करणे बाकी असल्यामुळे मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पुरवठादारांना चेक अदा करु नये असे कळविले होत. त्यानंतर तशी खात्री झाल्यांनतर संबंधितास चेक देण्यात आलेला आहे.

१०. खर्चाबाबत विनियोग दाखला निर्गमित करण्यात आलेला आहे. मालाचा पुरवठा विहित मुदतीत झाला आहे.

३.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकरी जिल्हा परिषद आणि शिक्षणाधिकारी (प्राथ) रायगड यांची साक्ष दिनांक ५ मार्च, २०१२ रोजी घेतली. समितीने उपरोक्त आक्षेपा संदर्भात अशी विचारणा केली की, खरेदीचे आदेश केव्हा देण्यात आले, डेस्कचा पुरवठा झाल्यानंतर डेस्कची तपासणी केव्हा करण्यात आली, शासनाकडून उशीरा मंजूरी घेण्याची कारणे काय आहेत, कार्योत्तर मान्यता घेण्याची गरज का पडली, दोन संस्थांना दिनांक ३०/८/२००४ रोजी देयके पारित केल्यानंतर दि.१३/९/२००४ रोजी डेस्क नमुना तपासणी केली असे लेखा परिक्षकाने म्हंटल्यानुसार त्यास दिलेल्या उत्तरात मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांनी दिनांक १३/६/२००४ रोजी डेस्क नमुना तपासणी केली असे उत्तर देण्यात आले. तसेच २८ जून २००४ रोजी करारनामा केला असता लगेच खालापूर गटास ३०/६/२००४ रोजी डेस्क पुरवठा कसा केला या विसंगतीबाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साहित्याची तपासणी २३/०६/२००४ रोजी केली असून दिनांक २४/६/२००४ रोजी पुरवठादारास पुरवठा आदेश दिले आहेत. पुरवठा आदेश देईपर्यंत जून महिन्यात शाळा सुरु झाल्या होत्या व शाळा सुरु झाल्यानंतर लवकरात लवकर साहित्य मिळावे या हेतूने वरील प्रमाणे कार्यवाही केलेली आहे असे समितीला नमूद केले. तथापि, शासनाची उशीरा मंजूरी का घेण्यात आली याबाबतची माहिती देण्यात आली नाही.

प्राप्त झालेले ड्युएल डेस्क कोणत्या प्रकाराचे जसे सागवान/आडजात इत्यादी लाकडापसून बनविलेले आहेत यासंदर्भात तज्ञ समितीची नियुक्ती करण्यात आली होती का, तसेच पोलादपूर गटातील ९ शाळांना ४३ डेस्क विद्यार्थी संख्येनुसार कसे वाटप केले आणि उपरोक्त प्रकरणी केलेल्या खर्चाबाबत उपयोगिता दाखला निर्गमित करण्यात आलेला नाही. अशी समितीने विचारणा केली असता डेस्कची तपासणी शिक्षणाधिकारी (प्राथ) आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) यांनी केलेली आहे तसेच लाकडाची तांत्रिकदृष्ट्या तपासणी करण्याची आमची क्षमता नाही. दरकरारानुसार सदरची खरेदी केलेली आहे आणि निधीची तरतूद कमी केली असल्याने विद्यार्थ्यांना बसण्यासाठी डेस्क मिळावे या हेतूने मिळालेल्या ४३ नगांचे ९ शाळांमध्ये वाटप केले असून माल मिळाल्याच्या पावत्या त्यावेळी उपलब्ध नव्हत्या ? त्या उशीराने प्राप्त झाल्याचे समितीला सांगण्यात आले. तथापि, ९ शाळांपैकी प्रत्येक शाळेला किती डेस्कचे वाटप करण्यात आले याबाबतची माहिती दिली नाही.

३.३ उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने खालील मुद्या संदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीने अधिक माहिती मागविली.

१. ड्युएल डेस्क खरेदी बाबत शासनाकडून कार्योत्तर मान्यता मिळण्यापूर्वीच देयकाचे प्रदान का करण्यात आले ?

२. तसेच डेस्क सागाचे होते याची तपासणी त्या बाबतीतील तज्ञाकडून का करुन घेतली नाही त्याची कारणे काय आहेत ?

३. सदर डेस्कची तपासणी उप मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकरी यांनी कोणत्या अधिकारात केली ? उक्त अधिकारी अशी तपासणी करण्यासाठी तज्ञ होते काय ?

४. उक्त अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीचे निष्कर्ष काय आहेत ?

५. शासनाकडून ड्युएल डेस्कसाठी अनुदान विद्यार्थी संख्येच्या मानाने कमी प्राप्त झाले असताना आपण प्रत्येक शाळेतील विद्यार्थी संख्येनुसार प्रस्ताव शासनाकडे का पाठविला नाही या बाबत खुलासा करणेत यावा

त्यानुसार जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली

१. प्राथमिक शाळा या जुन महिन्यामध्ये सुरु होत असल्याने तातडीने दि. २४/०६/२००४ रोजी ड्युएल डेस्क खरेदी करणेत आलेले होते. डेस्क खरेदी करणेकरिता कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव शासनाकडे या कार्यालयाने दिनांक १७/८/२००४ रोजी सादर केलेला होता व त्यानंतर देयक अदा केले आहे. शासनाने त्याच कालावधीत दि.१८/१०/२००४ च्या पत्रान्वये कार्योत्तर मंजुरी दिली आहे.

२. ड्युएल डेस्क खरेदी करताना शासनाने मंजुर केलेले दरपत्रकानुसार (आर.सी.) दिपक इंडस्ट्रीयल को. ऑप. सोसायटी, मुंबई व दि स्किल्ड ब्लाइंड मेन्स इंडस्ट्रीयल सोसायटी मुंबई या पुरवठादारांकडून दिलेल्या अटी व शर्तीनुसार खरेदी करण्यात आली आहे. तथापी, तज्ञाकडून तपासणी करण्यात आली नाही.

३. आलेल्या निविदा उघडणे व दरपत्रक तपासणीची जबाबदारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) यांना दिले असल्याने त्याचा आधार घेवून पुरवठा झालेल्या डेस्कची तपासणी निविदा समिती म्हणून उप मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी व मा. सभापती, शिक्षण समिती यांनी दि.२३/६/२००४ रोजी तपासणी केली आहे.

४. तपासणीत पुरवठा केलेले ड्युएल डेस्क सागवानी असल्याचे आढळून आले आहे.

५. शाळांना डेस्क/बेंच पुरविणे हि योजना नव्यानेच सुरु झालेली होती त्यामुळे उपलब्ध अनुदानातून डेस्क खरेदी करणेत आली आहे.

३.४ विभागीय सचिवांची साक्ष :-

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या संदर्भात दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ड्युएल डेस्क खरेदीबाबत शासनाकडून कार्योत्तर मान्यता मिळण्यापूर्वीच देयकाचे प्रदान का करण्यात आले, तसेच डेस्क सागवानाचे होते याची तपासणी त्याबाबतीतील तज्ञाकडून का करुन घेतली नाही, या बाबतची समितीला माहिती भेटीच्या वेळी मिळू शकली नसल्याने विभागीय सचिवांनी समितीला माहिती द्यावी असे समितीने सांगितल्यानुसार, ११ व्या वित्त आयोगामार्फत

प्राप्त झालेल्या अधिकच्या निधीतून रायगड जिल्ह्याकरिता ३१ लाख २५ हजारांची तरतूद करण्यात आली होती या तरतूदीमधून शासनाच्या दरपत्रकाप्रमाणे दोन संस्थांकडून ११५५ ड्युएल डेस्कची खरेदी करण्यात आली. एका ड्युएल डेस्कची किंमत २४६० इतकी होती. जून महिन्यात डेस्कचे वाटप करायचे असल्याने त्याबाबतचे आदेश देवून दिनांक २४/६/२००४ रोजी खरेदी करण्यात आली. याबाबतचा कार्योत्तर प्रस्ताव शासनाकडे १७/८/२००४ मध्ये पाठविण्यात आला असून त्यास १८/१०/२००४ रोजी कार्योत्तर मान्यता दिली. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी आणि सभापती, शिक्षण समिती यांनी डेस्कची क्वॉलिटी तपासली असून यासंदर्भातील कराचे पालन केले आहे किंवा कसे याबाबतची पहाणी करुनच डेस्कचे पेमेंट अदा करण्यात आले असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले. तसेच दरकरारात ड्युएल डेस्क करिता सागवानी किंवा विशिष्ट प्रकारचे लाकडू वापरले पाहिजे तसेच ड्युएल डेस्क तज्ञांच्या समितीने तपासले पाहिजेत अशी तरतूद केलेली नसून केवळ ड्युएल डेस्कचे वर्णन दिलेले होते. तसेच खरेदी समितीने ड्युएल डेस्कची प्रत्यक्ष तपासणी केली होती असे समितीस सांगितले.

३.५ अभिप्राय व शिफारशी :-

जिल्हा परिषदेला ड्युएल डेस्कची खरेदी करण्यासाठी शासनाची विहित कालावधीत मान्यता घेणे अपेक्षित असताना तसे न करता घाईने खरेदी करुन त्यानंतर मान्यता घेण्यात आली. वास्तविक खरेदी करावयाची आहे हे जिल्हा परिषदेला माहिती असल्याने त्यांनी विहीत कालावधीत शासनाची मान्यता घेणे आवश्यक होते. तथापि, तसे न करता अगोदर खरेदी करुन त्यांनतर शासनाची मान्यता घेतली असल्याने संबंधित अधिकाऱ्याने कर्तव्यात कसुर केली असुन संबंधित अधिकाऱ्याचा निष्काळजीपणा दिसुन येत आहे. प्राप्त झालेल्या ड्युएल डेस्कची तपासणी केव्हा केली, तसेच देयक अदा केंव्हा करण्यात आले व माल केंव्हा प्राप्त झाला यासंदर्भात देण्यात आलेल्या उत्तरांमध्ये विसंगती दिसून आली असल्याने संबंधित अधिकारी साक्षीसाठी तयारी करुन आले नव्हते. याबाबत संबंधितांनी निष्काळजीपणा केला असल्याचे समितीचे मत झाले आहे. ड्युएल डेस्कसाठी कोणत्या प्रकरच्या लाकडाचा वापर करावा, तपासणी करण्यासाठी तज्ञांची समिती नियुक्त केलेली नसणे या गोष्टी दरकरारात नमूद नसल्या तरी करण्यात येणारी खरेदी गुणवत्तेनुसार करण्यासाठी संबंधितांनी कोणतेही प्रयत्न केलेले दिसून आले. इतकेच नव्हे तर ९ शाळांना ४३ ड्युएल डेस्कचे वाटप विद्यार्थी संख्येनूसार करण्यात आले असले तरी प्रत्येक शाळेला एकूण किती ड्युएल डेस्क देण्यात आले याबाबतची माहिती समितीला मिळू शकली नाही. त्यामुळे अपेक्षित असलेले ड्युएल डेस्क संबंधित शाळेस मिळाले किंवा नाही याबाबत समितीला शंका वाटते. उपरोक्त प्रकरणी केलेल्या खर्चाबाबत उपयोगिता दाखला निर्गमित करण्यात आलेला नाही. यावरुन सदर माल विहित मुदतीत मिळाला नसल्याचे स्पष्ट होत असून वेळेत प्राप्त न झालेल्या मालावर ५ टक्के प्रमाणे दंडाची रक्कम परिगणीत करुन वसूल करणे अपेक्षित आहे. तथापि, याबाबत दंडाची वसुलीची कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने यास कोणासही जबाबदार धरण्यात आलेले नाही. याप्रकरणी लेखा परीक्षकांनी आपल्या तपासणीत जे आक्षेप काढले आहेत त्यांना सविस्तर व मुद्देसुद खुलासा संबंधितांनी केलेला नाही, त्याबद्दल समिती तिव्र नाराजी व्यक्त करीत आहे. ड्युएल डेस्क कोणत्या लाकडाचे असावे त्यांचे आर्युमान किती असावे याबाबत कोणतेही धोरण नसून मार्गदर्शक तत्वे नाहीत.

समिती **अशी शिफारस करते की, खरेदी करण्यासाठी आवश्यक असलेली शासनाची मान्यता विहीत कालावधीत न घेतल्याची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. यापुढे ड्युएल डेस्कची खरेदी करताना लाकूड कोणत्या जातीचे वापरले पाहिजे, त्याचे आर्युमान किती असावे, तपासणी करण्यासाठी तज्ञांची समिती नियुक्त करणे या मुद्यांचा दरकरारात समावेश नसल्याने या प्रकरणी शासनाने तात्काळ धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी समिती शिफारस करीत आहे. विहीत मुदतीत माल न मिळाल्याने ठेकेदाराला ५ टक्के दंड करणे अपेक्षित असताना तसे न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याची जबाबदारी निश्चित करुन त्यावर कारवाई करण्यात यावी व कमी दंड वसुलीची रक्कम संबंधित देणे, लेखा परिक्षणात घेतलेल्या आक्षेपाला विसंगत उत्तर देणे या प्रकरणी संबंधितांना समज देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा.**

प्रकरण चार

४.१ अनुदान खर्चास मंजूरी नसताना गणवेश कापड व शिलाईसाठी खर्च केल्याबाबत :-

परिच्छेद क्रमांक ३.३९ : जिल्हा परिषद, रायगड सन २००४-२००५ (परिच्छेद क्रमांक २५) मागासवर्गीय मुले/मुलींना विशेष सवलत योजनेखाली महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मुंबई यांचेकडून रुपये ६,७९,०५४/- चे कापड खरेदी व प्रगती महिला बचत गट कर्जत यांचेकडून गणवेश शिलाई करण्यासाठी रुपये २,११,८८८/- अदा केली आहेत.

याबाबत **लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :-**

१. मागासवर्गीय मुले मुलींना विशेष सवलत योजनेखाली दिनांक २७ नोव्हेंबर, २००३ रोजी ११ लाख २३ हजार अनुदान प्राप्त झाले होते ते २००३.२००४ मध्ये खर्च न झाल्याने शिक्षण विभागाने पत्र क्रमांक राजिप/शिक्षण/वशी/लेखा-२/७७१६ दिनांक ३ डिसेंबर, २००४ व पत्र क्रमांक १४९२ दिनांक ९/३/२००५ अन्वये शालेय शिक्षण विभागाकडे खर्च करण्यास परवानगी मागितली होती त्याप्रमाणे शासनाची मंजूरी प्राप्त

झाली नसताना २००४-२००५ मध्ये रुपये ८,९१,०४२/- खर्च कसा केला याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

२. ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक गणवेश/२००४/प्रक्र ५/परा-७/दिनांक २७ फेब्रुवारी, २००४ अन्वये मागील वर्षी ज्या दराने शिलाई झाली त्याच दराने महिला बचत गटाकडून गणवेश शिलाई करुन घ्यावयाचे आहे त्यानुसार प्रगती महिला बचत गटास शिक्षण विभागाने केलेली विचारणा व त्यांचे संमतीपत्र नस्तीमध्ये उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे प्रगती महिला गटाने मागील शिलाई दरास संमती दिल्याचे पडताळणी करता आली नाही.

३. शासन निर्णय गणवेश/२००१/प्र.क्रमांक १४२/पंरा-७/दिनांक १५ ऑक्टोबर, २००३ अन्वये जिल्हा परिषदेने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग कापड महामंडळाकडे दिनांक १० फेब्रुवारी, २००४ रोजी पुरवठा मागणी नोंदविलेली असून महामंडळाने दिनांक २३ मार्च, २००४ रोजी करारनामा केला आहे. त्यामधील परिच्छेद क्रमांक ५ नुसार दोन महिन्यात मालाचा पुरवठा करणे बंधनकारक होते. प्रत्यक्षात दिनांक ४ जून, २००४ रोजी पुरवठा केला आहे. वरील शासन निर्णयानुसार वेळीच पुरवठा आदेश न दिल्याने महामंडळाने मुदतीत माल पुरवठा केला नाही व त्यामुळे सन २००३-२००४ मध्ये अनुदान खर्च होऊ शकले नाही. महामंडळाने उशिरा कापड पुरवठा केल्याने महामंडळाकडून १० टक्के प्रमाणे दंड रुपये ६७,९०५/- वसूल करणे आवश्यक आहे.

४. तालुका मास्तर यांनी गणवेश प्राप्त झाल्याबाबत साठा नोंदवही व वाटप नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध केलेली नाही त्यामुळे गणवेश वाटप/शिल्लके बाबत पडताळणी करता आली नाही.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला:-

१. सदरची रक्कम रुपये ११,२३,०००/- एवढा निधी सन २००४-२००५ मध्ये खर्च करणेसाठी या विभागाचे पत्र क्रमांक १४/५/२००४, ३१/१२/२००४ व ९/३/२००५ अन्वये शासनाकडे मंजूरी मागविणेत आलेली होती. शासनाने पत्र क्र.पीआरई/२००५/१७९/०५/प्रशि-५/दिनांक २९ नोव्हेंबर, २००५ अन्वये सदरचे अनुदान सन २००५-२००६ मध्ये खर्च करणेस परवानगी देण्यात आली आहे.

२. ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय क्रमांक गणवेश/२००४/प्रक्र ५/परा-७/दिनांक २७ फेब्रुवारी, २००४ अन्वये मागील वर्षी ज्या दराने शिलाई झाली त्याच दराने शिलाई करुन देणे बाबतचे आदेश संबंधित महिला बचत गटास या कार्यालयाकडून देणेत आलेले आहेत व त्याप्रमाणे त्यांनी शिलाईचे बिल या कार्यालयास सादर केलेले आहे.

३. शासनाने पत्र क्रमांक पीआरई/२००५/१७९/५/प्रशि-५/दिनांक २९ नोव्हेंबर, २००५ अन्वये सन २००३-२००४ मधील तरतूद खर्च करण्यास सन २००५-२००६ मध्ये खर्च करणेस परवानगी दिलेली आहे. त्यामुळे संबंधित पुरवठ्याचे देयक सन २००५-२००६ मध्ये देण्यात आलेले आहे.

४. तालुका मास्तर यांनी गणवेश प्राप्त झाल्याबाबत साठा नोंदवही आता उपलब्ध करण्यात आलेली आहे.

४.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांची दिनांक ०५ मार्च, २०१२ रोजी साक्ष घेतली. समितीने उपरोक्त आक्षेपासंदर्भात अशी विचारणा केली की, तालुका मास्तर यांनी गणवेश प्राप्त झाल्याबाबत साठा नोंदवही व वाटप नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे गणवेश वाटप/शिल्लकेबाबत पडताळणी करता आली नाही तसेच तालुका मास्तर यांच्याकडील गणवेश प्राप्त झाल्याबाबतची साठा नोंदवहीची सत्यप्रत लेखापरिक्षकांना उपलब्ध करुन देण्यात आली नाही. पंचायती राज समितीचा दौरा लागला म्हणून उपलब्ध करण्यात आली काय ?, गणवेश चांगल्या किंवा फाटलेल्या स्थितीत आहेत काय अशी समितीने विचारणा केली असता त्यावर शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी असे सांगितले की, त्यावेळी नोंदवही उपलब्ध न झाल्यामुळे लेखा परिक्षकांना दाखविता आली नाही. परंतु सत्यप्रत नंतर लेखापरिक्षकांना दाखविली आहे, तसेच सद्याः सदरचे गणवेश फाटून गेले आहेत. त्यानंतर समितीने अशी ही विचारणा केली की, आपण साठा नोंदवहीची मूळ प्रत लेखा परिक्षकांना दाखविली नाही. तसेच मूळ प्रत पाहिल्याशिवाय आपण निधी कसा मंजूर केला, तालुका मास्तर हे तालुक्याच्या ठिकाणी असतात त्यांनी १०० मुलांचे गणवेश पाठविल्यांनतर त्याबाबत साठा नोंदवहीमध्ये नोंद केली पाहिजे, परंतु तालुका मास्तरांनी प्राप्त झालेले गणवेश आणि पाठविण्यात आलेले गणवेश याची साठा नोंदवहीमध्ये नोंद केली नाही यासंदर्भात असा खुलासा करण्यात आला की, गणवेशाचा साठा थेट तालुक्याला पाठविला जातो, तो जिल्हा मुख्यालयामध्ये येत नाही. ज्याच्याकडे आर.सी. आहे त्याच्याकडे पोहोचविला जातो असे शिक्षणाधिकारी (प्राथ) यांनी समितीला सांगितले. समितीने अशी विचारणा केली की, साठा नोंदवहीची मूळ प्रत आपल्याकडे आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरची मूळ प्रत तालुक्यात उपलब्ध असून ते संपूर्ण अभिलेख मागवून समितीला दाखविण्यात येईल असे समितीने सांगितले. या बाबीकरिता सन २००३-२००४ मध्ये अनुदान प्राप्त झाले. सन २००४-२००५ मध्ये प्रस्ताव पाठविण्यात आला आणि सन २००५-२००६ मध्ये गणवेशाचे वाटप करण्यात आले, ही रक्कम खर्च करण्यास कुणी परवानगी दिली व यामध्ये झालेल्या अनियमिततेला कोण जबाबदार आहे, सन २००३-२००४ मध्ये अनुदान प्राप्त झाल्यानंतर सन २००४-२००५ मध्ये शासनाची परवानगी नसतांना आपण खर्च कसा केला अशाप्रकारे शासनाची मान्यता न घेता आपल्याला अनुदान खर्च करता येतो काय, सन २००३-२००४ मध्ये शासनाने गणवेशाकरिता अनुदान मंजूर केले असातांना गणवेशाच्या लाभापासून आपण मुलांना वंचित कां ठेवेले, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला अशी माहिती दिली की, सन २००३-२००४ मधील तरतूद असली तरी शासनाकडून २९ नोव्हेंबर, २००५ रोजी खर्च करण्यास परवानगी मिळाली, तत्कालीन अधिकाऱ्यांनी आदेश दिले होते. गणवेशाच्या खरेदीसाठी अनुदान आले होते. त्यावेळी पुरवठादारांनी देयके प्राप्त करुन कायोर्त्तर मंजूरी घेतली होती. या अनियमिततेला तत्कालीन शिक्षणाधिकारी जबाबदार आहेत असे सांगितले.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्या संदर्भात जिल्हा परिषदेकडून लेखी स्वरुपात अधिक माहिती मागविली.

१. सन २००३-२००४ मध्ये गणवेशा करिता अनुदान प्राप्त झाले असताना २००४-२००५ मध्ये शासनाची परवानगी नसताना खर्च का करण्यात आले. तसेच शासनाची मान्यता नसताना अनुदान खर्च करता येते काय याबाबत खुलास करणेत यावा ?

२. शासनाने गणवेश पुरवठा करण्याकरिता सन २००३-२००४ मध्ये अनुदान मंजूर केले असताना गणवेशाच्या लाभापासून मुलांना त्या वर्षी वंचित का ठेवण्यात आले, त्या जबाबदार तत्कालीन शिक्षणाधिकारी यांच्यावर काय कारवाई केली आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला :-

१. सन २००३-२००४ मध्ये अनुदान प्राप्त झाल्यांनतर त्याच वर्षात शासनाकडून मार्गदर्शक सूचनांनुसार वस्त्रोद्योग महामंडळ यांना गणवेशाचे कापड पुरविणेसाठी व मध्यवर्ती कारागृह यांना लेखन साहित्य पुरविणे बाबत पत्रव्यवहार करुनही त्यांनी योग्य तो प्रतिसाद न दिल्याने त्याच वर्षात खर्च होऊ शकला नाही. त्यामुळे सन २००३-२००४ ची अखर्चीत रक्कम सन २००४-२००५ मध्ये खर्च करुन अनु.जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना गणवेश पुरविण्यात आलेले आहेत. सदरच्या केलेल्या खर्चास शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग पत्र क्र.पीआरई २००५/(१७९/०५)/प्रशि-५ दिनांक २९ नोव्हेंबर, २००५ अन्वये परवानगी दिलेली आहे.

२. सन २००३-२००४ मध्ये गणवेश खरेदीकरीता वस्त्रोद्योग महामंडळ व मध्यवर्ती कारागृह पुणे या संस्थेकडे गणवेश कापड व लेखनसाहित्य खरेदी करीता पत्रव्यवहार करुन योग्य तो प्रतिसाद न मिळाल्याने सदरचे गणवेश व लेखन साहित्य सन २००४-२००५ मध्ये खरेदी करुन विद्यार्थ्यांना वाटप करणेत आले आहे. सदर कार्यवाहीस शासनाची कार्योत्तर मान्यता घेण्यात आली आहे.

विभागीय सचिवांची सक्ष :-

जिल्हा परिषदेकडून साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २००३-२००४ मध्ये विद्यार्थ्यांना गणवेश मिळाले नाहीत या सदंर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोणती कारवाई केली, तसेच मूळ साठा नोंदवह्या का दाखविण्यात आल्या नाहीत, अशी समितीने विचारणा केली असता यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २००३-२००४ मध्ये गणवेश खरेदी संबंधित यंत्रमाग महामंडळ आणि मध्यवर्ती कारगृह यांच्याशी पत्रव्यवहार केला होता, परंतु त्यांच्याकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे तो खर्च पुढील वर्षात करण्यात आला व यासाठी शासनाची कार्योत्तर मान्यता घेतलेली आहे तसेच मूळ साठा नोंदवह्या त्यावेळी तालुकास्तरावर असल्यामुळे लेखापरिक्षकांना

उपलब्ध करुन देता आल्या नाहीत. आता ह्या नोंदवह्या दाखविण्यासाठी आणलेल्या आहेत. तसेच यापुढे नोंदवह्या जिल्हस्तरावर उपलब्ध करुन घेण्याबाबत दक्षता घेण्यात येईल असेही समितीस सांगितले.

विद्यार्थ्यांना गणवेश तयार करण्याचे काम शालेय व्यवस्थापन समितीकडे सोपविलेले असल्याने कपड्याचा रंग, त्याची गुणवत्ता आणि त्याची किंमत इत्यादीबाबतीत कश्याप्रकारे नियंत्रण ठेवले जाते. गणवेशाचे कापड चांगल्या मिलकडून खरेदी करण्यात येईल काय, अशी समितीने विचारणा केली असता यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सन २००९ मध्ये केंद्र शासनाने शिक्षणाच्या हक्कसंबंधिचा कायदा केलेला असून, त्यानुसार गणवेशाचे वाटप आणि कापड कोठून खरेदी करावयाचे यासंबंधिचे आदेश शालेय व्यवस्थापन समितीकडे सोपविलेले आहे. तसेच बॉम्बेडाईंग सारख्या चांगल्या कंपनीकडून कापड खरेदी करण्यात यावे अशा सूचना आम्ही दिलेल्या आहेत. स्थानिकस्तरावरील समित्यांना गणवेशासंबंधिचे अधिकार दिलेले आहेत, यासंदर्भात समितीने केलेल्या सूचनेनुसार आम्ही केंद्र शासनाला विनंती करु असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

४.५ अभिप्राय व शिफारशी :-

उपरोक्त माहिती वरुन असे दिसून येते की, शालेय विद्यार्थ्यांना गणवेशासाठी कापड खरेदी करावयाचे आहे असे पुर्वनियोजित असतानाही प्रत्येक वर्षी जिल्हा परिषदेतील विद्यार्थ्यांना गणवेश पुरविले जातात. हे लक्षात घेता शाळा सुरु झाल्याबरोबर विद्यार्थ्यांना गणवेश पुरविण्याबाबतचे नियोजन करणे आवश्यक असते. ही बाबत विचारात घेता सन २००३-२००४ मध्ये गणवेशाकरिता मिळालेले अनुदान २००४-२००५ मध्ये खर्च करण्यात आले तसेच यासाठी शासनाची परवानगी घेणे आवश्यक असताना तसे न करता कार्योत्तर परवानगी घेण्यात आली. वास्तवीक खरेदी करावयाची आहे हे जिल्हा परिषदेला माहिती असल्याने त्यांनी विहीत कालावधीत शासनाची मान्यता घेणे आवश्यक होते. तथापि, तसे न करता अगोदर खरेदी करुन त्यांनतर शासनाची मान्यता घेतली असल्याने संबंधित अधिकाऱ्याने कर्तव्यात कसुर केली असल्याचे दिसून आले आहे. याबाबत संबंधितांनी निष्काळजीपणा केला असल्याचे समितीचे मत झाले आहे. समितीच्या मते शालेय विद्यार्थ्यांना वर्गामध्ये बसण्यासाठी बस्करपट्या पुरेशा प्रमाणत उपलब्ध नसल्याचे तत्कालीन शिक्षणाधिकारी यांना जाणिव होताच त्यांनी तातडीने ड्युएल डेस्क खरेदी करण्याची तत्परता दाखविली. या खरेदीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी विहीत मान्यता प्राप्त करुन घेणेसुध्दा उचित समजले नाही. शासनाकडून कार्योत्तर मान्यताही विलंबाने घेतली. उलटपक्षी, याच अधिकाऱ्यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या गणवेशाबाबत इतकी उदासिनता दाखविली की, सन २००३-२००४ मध्ये गणवेश खरेदीसाठी प्राप्त अनुदान सन २००४-२००५ मध्ये म्हणजे एक वर्षाच्या विलंबाने खर्च करण्यात आले. समितीच्या मते ड्युएल डेस्कच्या खरेदीसाठी विहीत कार्यप्रणालीचा अवलंब न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांनी गणवेश खरेदीबाबत कोणताही पुढाकार न घेणे हे संशयास्पद आहे. समिती याबाबत सखेद आश्चर्य व्यक्त करते. सबब, समिती अशी शिफारस करते की, खरेदी करण्यसाठी आवश्यक असलेली शासनाची मान्यता विहीत कालावधीत न घेतल्याची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. या पुढे गणवेशाचे कापड खरेदी करताना कपड्याचा रंग, त्याची

गुणवत्ता इत्यादीबाबींची शहानिशा करुनच निर्णय घेण्यात यावा. तसेच साठा नोंदवह्या उपलब्ध करुन न देणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यात यावी. सैन्य दलातील माणसे मिलमध्ये जाऊन त्यांना पाहिजे त्या गुणवत्तेचे कापड बनवून घेतात अशा प्रकारे विद्यार्थ्यांना गणवेशाचे कापड बनवून घेतल्यास कपड्याच्या गुणवत्तेमध्ये आणि खरेदी-विक्रीमध्ये विसंगित न येता विद्यार्थ्यांना विहित कालावधी गणवेशाचे कापड मिळू शकेल.

प्रकरण पाच

५.१ वारक, कशेडी रस्ता दुरुस्त करणे कामातील अनियमितता :-

परिच्छेद क्रमांक ३.१०४ : जिल्हा परिषद, रायगड सन २००४-२०५ (परिच्छेद क्रमांक ६१) बांधकाम विभागाने वारक, कशेडी रस्ता दुरुस्ती करणेकरिता रुपये ४,९२,७०८/- एवढ्या रकमेचे काम केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :-

१. उपअभियंता यांनी स्वाक्षांकित केलेल्या लीडसाठीच्या रस्त्याच्या नकाशानुसार मुरुम, लीड ५ कि.मी. दर्शविले आहे. कामाच्या दरपृथःकरणामध्ये मुरुम लिड ६ कि.मी.प्रमाणे आकराणी केली आहे. सबब ६ कि.मी. चे लिड रुपये ८९.८४ वजा ५ कि.मी. चे लिड रुपये ८२.५१ यातील फरक रुपये ७.३३ प्रती घ.मी.प्रमाणे १४४.९० घ.मी. पोटी रुपये १,०६२ अतिप्रदान झाले आहे. ते संबंधिताकडून वसूल करण्यात यावे.

२. बाब क्रमांक १ नुसार ४२३.३६ घ.मी. ४० एम एम खडी आणली असून त्यावर पसरण्यासाठी मुरुम १४४.९० घ.मी. आणला आहे. मुख्य अभियंता दक्षता व गुणनियंत्रक विभाग यांचे परिपत्रक दिनांक १२ मार्च, १९९३ नुसार खडीच्या २५ टक्के मऊ मुरुम वापरणे आवश्यक असून ४२३.३६ चे २५ टक्के १०५.८३ घ.मी. जास्त मुरुम वापरणे आवश्यक असता १४४.९० घ.मी. वापरल्यामुळे ३९.०६ घ.मी. जादा मुरुम वापरल्यामुळे रुपये ४,६४९ चे अतिप्रदान झाले आहे त्याची संबंधित ठेकेदाराकडून वसुली करण्यात यावी.

३. मुख्य अभियंता यांचे ३१ नोव्हेंबर, १९९२ चे परिपत्रकानुसार ४० एम.एम.खडी पसरणेपूर्वी दुसरे अभियंत्याकडून क्रॉस चेकींग करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही का केली नाही याचा खुलास करण्यात यावा.

४. सदर कामासाठी लागणारे ९.८८ मे.टन दिनांक १३ जानेवारी, २००५ रोजी आणले आहे. शासन परिपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक एम.टी.आर/१०८६/१८४/बांधकाम, दिनांक १५ जून, १९८८ नुसार विविध राज्यांच्या तापमानाचा अभ्यास करुन महाराष्ट्रात ६० ते ७० ग्रेडचे डांबर वापरणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रमाणकात नमूद केले प्रमाणे ते ८० ते १०० ग्रेडचे वापरण्यात आल्याने रस्त्याचे काम निकृष्ट झाल्याचे स्पष्ट होते.

५. सदर कामाच्या अंदाजपत्रकात नमूद केलेप्रमाणे रस्त्याची एकूण लांबी ३ कि.मी. असून त्यापैकी साखळी क्रमांक ०/० ते २/०० मध्ये डांबरीकरण केलेले आहे. २/० ते ३/० मध्ये पूर्वीचे खडीकरण झाले असून यामधील २/० ते २/७७५ याप्रमाणे एकूण ७७५ मीटर रस्त्याचे डांबरीकरण करणेचे होते. परंतु मोजमाप पुस्तक ८३८१ मधील नोंदी तपासता काम साखळी क्रमांक १/५०० ते २/२०० मध्ये केलेआहे म्हणजे पूर्वी डांबरीकरण झालेल्या रस्त्यावर ५०० मीटर पूर्वी खडीकरण झालेल्या रस्त्यावर २०० मीटर याप्रमाणे एकूण ७०० मीटर काम केले आहे. म्हणजे ७५ मीटर लांबीचे काम केल्याचे सकृत दर्शनी दिसून येते. तरी याबाबत सविस्तर खुलासा करणेत यावा.

उपरोक्त अभिप्रायाबाबत समितीला जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला :-

१. संबंधित ठेकेदाराकडून अतिप्रदान झालेली रक्कम रुपये १०६२/- वसुल करणेत आली आहे.

२. रक्कम गोळा केलेल्या मुरमांपैकी २५ टक्के इतकाच मुरुम खडीकरणासाठी वापरणेत आला आहे. उर्वरित ३९.०६ घ.मी. मुरुम हा रस्त्याच्या बाजूपट्टीसाठी वापरणेत आला आहे. बाजूपट्टीसाठी मुरुम गोळा करणे व पसरविण्याच्या कामाचा समावेश अंदाजपत्रकात आहे. त्याप्रमाणे काम करणेत आले आहे. त्यामुळे अतिप्रदान झाले नाही.

३. खडी गोळा करणे व पसरविण्याचे काम एकाच ठेकेदाराकडून करण्यात आले आहे. जिल्हा परिषद लेखासंहिता सेक्शन २०७ (३) नुसार खडी गोळा करणे व पसरविणे हे काम एकाच ठेकेदाराकडून करण्यात आले असल्याने पसरविण्यापूर्वी दुसऱ्या अभियंत्याकडून क्रॉस चेकिंग करुन घेणे आवश्यक नाही. त्यामुळे सदरची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

४. अंदाजपत्रकाप्रामणे ६०/७० ग्रेडचे डांबर वापरणे आवश्यक होते. परंतु सदर ग्रेडचे डांबर उपलब्ध न झाल्याने काम करताना ८०/१०० ग्रेडचे डांबर वापरणेत आले आहे. डांबराच्या किमतीच्या फरकाची रक्कम रुपये २२,२०८/- कामाच्या अनामत रक्कमेतून वसुल करणेत आली आहे. तरी सदर रस्त्याचे काम योग्य प्रकारे करण्यात आले आहे.

५. काम करणेपूर्वी अस्तित्वात असलेला रस्ता हा सा.क्र.०/० ते २/०० कि.मी. मध्ये डांबरी पृष्ठभागाचा असला तरी, सा.क्र.१/५०० ते २/०० कि.मी. या लांबीत अत्यंत खराब झालेला होता म्हणून साक्र १/५०० ते २/२०० कि.मी. मधील ७०० मीटर रस्त्याचे डांबरीकरण करणेत आले आहे. त्याप्रमाणे मोजमाप पुस्तकामध्ये नोंद करणेत आलेली आहे. करणेत आलेले काम हे अंदाजपत्रकाप्रमाणे ७०० मीटरचे करणेत आले आहे. त्यामुळे अंदाजपत्रकापेक्षा कमी लांबीचे काम झालेले नसून अंदाजपत्रका इतकेच काम झालेले आहे.

५.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांची दिनांक ०५ मार्च, २०१२ रोजी साक्ष घेतली. समितीने उपरोक्त आक्षेपासंदर्भात रस्त्याचे काम करित असताना कोणत्या ग्रेडचे डांबर वापरले जाते, या ठिकाणी तसे वापरण्यात आले आहे काय, त्यावेळी संबंधित शाखा अभियंता उपस्थित होते काय, असेल तर त्यांनी डांबर वापरण्यास अनुमती कशी दिली व डांबराची ग्रेड का तपासण्यात आली नाही अशी विचारणा केली असता, कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी, अंदाजपत्रकाप्रमाणे ६०/७० ग्रेडचे डांबर वापरणे आवश्यक होते. परंतु, सदर ग्रेडचे डांबर त्यावेळी उपलब्ध न झाल्यामुळे ८०/१०० या ग्रेडचे डांबर वापरण्यात आले. तसेच चलनावर डांबराचे ग्रेड लिहीलेली असते त्याप्रमाणे काम सुरु करण्यापूर्वी डांबराची ग्रेड तपासून घेतली जाते, असे समितीस सांगितले. तथापि, चांगल्या

दर्जाचे डांबर न वापरल्यामुळे सदरचा रस्ता लवकर खराब होतो, पावसाळ्यात रस्त्यावर खड्डे पडतात याला जबाबदार कोण ? अशी समितीने विचारणा केली असता यास उत्तर देण्यात आले नाही.

५.३ समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्या संदर्भात जिल्हा परिषदेकडून लेखी स्वरुपात अधिक माहिती मागविली.

१. वारक कशेडी येथील ज्या रस्त्यावर डांबर वापरले जाणार होते त्या ठिकाणी शाखा अभियंता उपस्थित होते काय, तसेच ८०/१०० ग्रेडचे डांबर वापरणेस अनुमती कोणी व का दिली या बाबत खुलासा करणेत यावा.

२. तसेच डांबर चांगल्या ग्रेडचे न वापरल्यामुळे रस्त्यावर खड्डे पडले यास जबाबदार कोण आहेत व त्यांचेवर आपण काय कारवाई केली आहे याबाबत खुलासा करावा.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला :-

१. वारक कशेडी, ता.माणगाव येथील ज्या रस्त्यावर डाबर वापरले गेले त्या ठिकाणी संबंधित शाखा अभियंता उपस्थित होते. सदरचा निर्णय संबंधित शाखा अभियंता व उप अभियंता यांनी त्यांचे स्तरावर घेतलेला आहे.

२. प्रत्यक्षात काम करतांना ६०/७० चे ग्रेडचे डांबरा ऐवजी ८०/१०० ग्रेडचे डांबर वापरले बाबत संबंधित शाखा अभियंता व तत्कालीन उप अभियंता यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावीत आहे.

५.४ विभागीय सचिवांची साक्ष :-

जिल्हा परिषदेकडून साक्षीच्या वेळी व मागावून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षीच्या वेळी उपरोक्त आक्षेपासंदर्भात ८०/१०० ग्रेडचे डांबर वापरण्यात अनुमती कोणी वा का दिली तसेच चांगल्या ग्रेडचे डांबर न वापरल्यामुळे रस्त्यावर पडलेल्या खड्यास जबाबदार कोण आहेत व त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता सदर कामातील अनियमिततेबाबत उप अभियंता व शाखा अभियंता यांच्या विरुध्द विभागीय चौकशी लावण्यात आली असून चौकशीचा अहवाल येत्या सहा महिन्यात येणे अपेक्षित आहे तसेच अहवाल आल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे सदस्य सचिव, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांनी समितीस सांगितले.

५.५ अभिप्राय व शिफारशी :-

वारक कशेडी या रस्त्याचे काम करतांना ६०/७० या ग्रेडचे डांबर न वापरता ८०/१०० या ग्रेडचे डांबर वापरल्यामुळे पावसाळ्यात रस्ता खराब झाल्याने यास संबंधित अभियंते जबाबदार असून प्रत्यक्ष कामाच्या वेळी ते हजर नव्हते तसेच या बाबीकडे त्यांनी जाणीपूर्वक दुर्लक्ष केले असल्याचे समितीचे स्पष्ट मत झाले आहे. याप्रकरणी त्यांची चालू असलेली विभागीय चौकशी सहा महिन्याच्या आत पूर्ण करुन त्यांच्या विरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तात्काळ सादर करण्यात यावा.

प्रकरण सहा

६.१ वडाची वाडी, पाझर तलाव बांधणे :-

परिच्छेद क्रमांक ३.२५५ : जिल्हा परिषद, रायगड सन २००४-२००५ (परिच्छेद क्रमांक ४२) वडाची वाडी पाझर तलाव बांधण्याकरिता रक्कम रुपये २,७६,४०,६०५ खर्च करण्यात आला आहे. सदर कामाची पंजिका व मोजमापवहीची पडताळणीनुसार खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१. बाब क्रमांक ९ मध्ये उपलब्ध मालातून निवडक माल वापरुन केसिंग झोनचे भरावयाचे काम ५३५८७.७० घ.मी.केले असून त्यामधून ५ टक्के घटाव वजा करणे आवश्यक असताना ती वजावट दर्शविलेली नाही, त्यामुळे केसिंग झोन भरावामध्ये ५ टक्केप्रमाणे २६७९.३९ घ.मी.पोटी प्रती घनमीटर २२.६५ रुपये प्रमाणे ६०,६८८ संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

२. बाब क्रमांक ११ मध्ये बॉरो एरियातून प्राप्त दगड लावण्याचे एकूण परिमाण ९९८४.२२ नोंदविलेले आहे. सदरचे परिमाण बाब क्रमांक ७ मध्ये हार्टिंग झोन भराव बांधकामातून वजा करुन उर्वरित परिमाणाची अदाई करणे आवश्यक असतना त्याचप्रमाणे उर्वरित भराव बांधकाम परिमाणातून ५ टक्के घटाव वजा करणे आवश्यक होते. त्यामुळे मक्तेदारास अतिरिक्त १०२५१.६५ घ.मी.चे प्रती घनमीटर रुपये ११२.८५ रुपये प्रमाणे रुपये ११,५६,९९८ अदा झालेली रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

३. जोड रस्त्याबाबत बाब क्रमांक १ (उप प्राकलन) माती भरावाचे काम केले असून त्याचे एकूण परिमाण ७१९३.२५ घ.मी.मधून १० टक्के घटाव वजा दर्शविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे वजावट न दर्शविल्याने ७१९.३२ घ.मी. ची प्रती घनमीटर ९९.३५ रुपये प्रमाणे ७१,४६४ वसूल होणे आवश्यक आहे.

४. बाब क्रमांक ८ नुसार केसिंग झोनमध्ये मक्तेदाराने आणलेल्या साहित्याचा वापर करुन ४३४८२ घ.मी. काम केले असून सदर कामावर ५ टक्के घटाव वजाती करुन अदाई केलेली नाही त्यामुळे ४३४८२ चे ५ टक्के २१७४ घ.मी.ची प्रति घनमीटर ११९.८० प्रमाणे रक्कम रुपये २,६०,४४५ जादा अदाई झाली आहे. सदर रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

५. बाब क्रमांक २ नुसार १९०२ झाडे तोडलेली असून मक्तेदारास प्रती झाड रुपये २८९ प्रमाणे अदाई केली आहे. सदर झाडांची काय विल्हेवाट लावली, याचा खुलासा झाला नाही. झाडतोडीपासून मिळालेल्या लाकडाची नोंद तसेच विनियोग बाबत साधार खात्री पटवावी.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला :-

१. लोडींग बर्मची Qty. ५३५८७.८० घनमीटर एवढी आहे. सर्व वापरलेले मटेरीयल हे धरणाच्या पाया खोदाई, C.O.T. व साडव्याच्या खोदाईतून उलब्ध झालेले साहित्य (कठीण कातळ) हे भरावासाठी वापरण्यात आले आहे. एकूण भरावयाची Qty पैकी ६२११.८० घनमीटर निव्वळ कठीण मुरुम आहे तसेच २०१.८७ घनमीटर Qty चा जादा भराव करणेत आला आहे व उर्वरित ४७३७६.०० घनमीटर हे कठीण कातळाचा भराव केला आहे. त्यामुळे संकुचन घटसाठी २ टक्के वजावट केलेली नाही. ६२११.८० घनमीटर निवडक मुरमासाठी जादा २०१.८७ घन मीटर परिमाणाचा भराव केला आहे. त्यामुळे वसुली करण्यात आली नाही.

२. बाब क्रमांक ११ मध्ये बॉरो एरियातून प्राप्त दगड लावण्याचे एकूण परिमाण ९९८४.२२ चौ.मी. नोंदविलेले आहे. सदरची बाब ही केसींग झोन मधून वजा केलेली आहे. त्याची नोंद मोजमाप पुस्तक नंबर १५७० पान न.३४ मध्ये केलेली आहे. सदरची बाब ही निव्वळ दगडाचे पिचिंग असल्याने त्यामधुन घट वजावट करण्यात आलेली नाही तसेच सदर बाबही हंटींग झोन मधून वजावट करण्याची नसल्याने अतिरिक्त १०२५१.६५ घनमीटर जादा दिलेली नाही. त्यामुळे सदरची रक्कम वसुल करण्यात आली नाही.

३. जोड रस्त्याबाबत बाब क्रमांक १ (उप प्राकलन) माती भरावाचे काम केले असून त्याचे एकूण परिमाण ७१९३.२५ घनमीटर केलेले आहे. सदर बाब ही निविदे व्यतिरिक्त असल्याने व जोड रस्त्याची आवश्यकता असल्याने त्याबाबीचे (EIRL) चे पहिले व अंतिम देयक दोन पावसाळे सिझन नंतर दिलेले असल्याने तसेच रस्त्याच्या भरावाची पाणी मारुन दबाई (Compaction) रोलर वापरुन केल्याने संकुचित घट वजावट करणेत आली नाही.

४. बाब क्रमांक ८ नुसार केसिंग झोनमध्ये मक्तेदाराने आणलेल्या साहित्याचा वापर करुन ४३४८२ घनमीटर कामाचे देयक हे दोन पावसाळ्या नंतर दिलेले असल्याने तसेच पुर्ण धरणाचे लांबीला काट छेदापेक्षा ०.५० मीटर उंचीचा जादा भराव केला असल्याने घट वजावट केलेली नाही. त्यामुळे रक्कम रुपये २,६०,४४५/- वसुल करण्यात आली नाही.

५. बाब क्रमांक २ नुसार १९०२ तोडलेली झाडे ही या तलावाचे बुडीत क्षेत्रातील जमीन मालक असलेल्या शेतकऱ्यांनी त्याचे क्षेत्रातील झाडे त्याच्या ताब्यात घेऊन खाजगी वापर केला आहे.

६.१ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांची दिनांक ०५ मार्च, २०१२ रोजी साक्ष घेतली. रायगड जिल्हा परिषदेमध्ये लघुपाटबंधाऱ्याची कामे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे सोपविण्यात आलेली आहेत. समितीने उपरोक्त आक्षेपासंदर्भात अशी विचारणा केली की, पाझर तलावाच्या हद्दित असलेली १९०२ झाडे तोडण्यासाठी ठेकेदारास प्रती झाड रुपये २८९ प्रमाणे देण्यात आले. तथापि, ठेकेदाराने झाडे तोडल्यानंतर झाडांचा लाकुडफाटा ताब्यात घ्यावयास पाहिजे होता. परंतु, शेतकऱ्यांनी त्याचा खाजगी वापर केला त्यामुळे ठेकेदाराला पैसे कशासाठी देण्यात आले, कापून ठेवलेली झाडे शेतकऱ्यांनी पूर्वपरवानगीने नेण्यात आली आहेत काय, तसेच तलावाची सद्यःस्थिती काय आहे, अशी

समितीने विचारणा केली असता कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) यांनी असे सांगितले की, ठेकेदाराला झाडे तोडण्यासाठी पैसे दिले असून ठेकेदाराने झाडे कापून एका बाजूला रचून ठेवली होती परंतु संबंधित शेतकरी ती झाडे घेवून गेलेली आहेत. तसेच सदरचा तलाव बांधून झालेला आहे. यासंदर्भात तलावासाठी संपादित केलेल्या जमिनाचा मोबदला शेतकऱ्यांना देण्यात आलेला आहे काय, यावर तलावासाठी लागणाऱ्या जमिनीचे भूसंपादन झालेले नसून भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रलंबित आहे असे कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) यांनी समितीस सांगितले.

६.३ समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्या संदर्भात जिल्हा परिषदेकडून लेखी स्वरुपात अधिक माहिती मागविली.

१. वडाची वाडी पाझर तलावासाठीच्या भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी रायगड यांचे कार्यालयाकडे प्रलंबित असताना व भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाली नसताना तलावाचे बांधकाम कसे केले याबाबत खुलासा करणेत यावा.

२. तसेच ठेकेदारांना झाडे तोडण्यास कोणी परवानगी दिली आणि सदर जमीनीचा मोबदला शेतकऱ्यांना दिला आहे काय, असल्यास कोणी व केव्हा याबाबत खुलासा करण्यात यावा

३. तसेच ठेकेदाराला १९०२ झाडे तोडण्यासाठी रुपये ५,४९,६७८/- कोणी दिले. तसेच ठेकेदाराने कापून ठेवलेली झाडे संबंधित शेतकऱ्यांची असल्याने सदर प्रकरणी झालेल्या खर्चाची रक्कम कोणाकडून वसूल केलेली आहे व केव्हा याबाबत खुलासा करण्यात यावा.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला :-

१. वडाची वाडी पाझर तलावासाठीच्या भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी रायगड यांचे कार्यालयाकडे प्रलंबित असताना व भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाली नसताना तेथील स्थानिक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सदर पाझर तलावाचे काम सन २००२ मध्ये हाती घेवून ते सन २००४ मध्ये पूर्ण करण्यात आले असून, तो पाझर तलाव पूर्ण क्षमतेने म्हणजे ९४४.८५ सहस्त्र घनमिटर क्षमतेने भरला जातो व त्या पाझर तलावावर अप्रत्यक्ष सिंचन ७१ हेक्टर्स होत आहे. सदर काम पूर्ण झाल्याने शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळला असून शेतकऱ्यांना दुबार पिक व बागायातीसाठी त्याचा उपयोग होत आह. तथापि, सदर जमिनीचे भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी रायगड यांचे कडे सादर केलेला आहे.

२. वडाची वाडी पाझर तलावाचे निविदेमध्ये तलावाचे बुडीत क्षेत्रातील झाडे तोडण्याच्या बाबीचा निवीदा B-१ मध्ये अंतर्भाव असल्याने त्यानुसार ठेकेदाराने झाडे तोडली आहेत. सदर जमीनीचा मोबदला शेतकऱ्यास अद्याप दिलेला नसून त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

३. धरणाच्या निविदेनुसार बुडीत क्षेत्रातील झाडे तोडण्याची बाब निविदा B-१ मध्ये समाविष्ट होती त्यानुसार ठेकेदारांनी झाडे तोडली व त्यानुसार ठेकेदाराला रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

६.४ विभागीय सचिवांची साक्ष :-

दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१२ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षीच्या वेळी उपरोक्त आक्षेपा संदर्भात समितीने अशी विचारणा केली की, प्राझर तलावासाठी भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रलंबित असताना व भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाली नसताना तलावाचे बांधकाम कसे केले, अशी समितीने विचारणा केली असता शेतकऱ्यांच्या संमतीने व त्यांच्या मागणीनुसार त्यांच्याकडून जमीन संपादित करुन या तलावाचे काम सुरु करण्यात आले होते. या तलावाकरिता लागणाऱ्या जमिनीकरिता भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्याला सादर केला होता. परंतु त्यामध्ये नगर रचना व वित्त विभागाच्या नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता होती. या प्रकरणासंदर्भात झाडे तोडून त्याचा योग्य तो मोबदला संबंधित शेतकऱ्यांना देणे एवढाच मर्यादित होता. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीवरील झाडे त्याची परवानगी न घेता व मार्केट रेटप्रमाणे त्या शेतकऱ्यांना झाडांच्या तोडणीची किंमत न अदा करता तोडण्यात आली असतील तर संबंधित शेतकऱ्याला जमिनीचा व झाडांचा योग्य तो मोबदला मिळणे अत्यंत आवश्यक आहे असे सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी समितीस सांगितले.

६.५ अभिप्राय व शिफारशी :-

समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहितीवरुन पाझर तलावाचे काम करताना त्यासाठी आवश्यक असणाऱ्या जमिनीचे संपादन करणे त्याचे मुल्यांकन करणे व त्याप्रमाणे संबंधित शेतकऱ्यांना त्याचा मोबदला अदा करणे या गोष्टी प्राथम्यक्रमाने करुन तलावाचे बांधकाम करणे आवश्यक आहे. तथापि, शेतकऱ्यांनी मागणी केली म्हणून व त्यांच्या समंतीने केलेले तलावाच्या कामासंदर्भात अनियमितता झाल्याचे समितीचे मत झाले आहे. तसेच ठेकेदाराने तोडलेली झाडे ताब्यात घेणे आवश्यक असतानाही तसे न करता सदरची झाडे संबंधित शेतकरी घेवून गेल्यामुळे ठेकेदाराला झाडे तोडण्यासाठी दिलेले ५ लाख ४९ हजार ६७८ एवढ्या रक्कमेचे शासनाचे नुकसान झालेले आहे तसेच सदरची रक्कम संबंधितांकडून वसूल करण्यात आलेली नाही. याप्रकरणी संबंधितांचा निष्काळजीपणा झाल्याचे दिसून येत आहे.

समितीच्या निदर्शनास आले की, वडाची वाडी पाझर तलावासाठी वित्त व नगररचना विभाग यांचे नाहरकत प्रमाणपत्र नसतांना देखील केवळ शेतकऱ्यांची मागणी विचारात घेऊन कोणत्याही प्रशासकीय मान्यतेशिवाय सदर पाझर तलावाचे काम रायगड जिल्हा परिषदेच्या संबंधित यंत्रेणेकडून पर्ण करण्यात आले. तथापि, सन २००४-२००५ पासून अद्यापही भूसंपादन प्रलंबित असून संबंधित शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला मिळालेला नाही.

समितीच्या मते, पाझर तलावाचे बांधकाम तात्काळ पूर्ण करणाऱ्या संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी भूसंपादन प्रक्रिया त्वरित पूर्ण करुन त्याचा मोबदला शेतकऱ्यांना मिळावा यासाठी मात्र सन २००४-२००५ पासून आजपावतो म्हणजे गेली आठ वर्षात कोणताही रस दाखविल्याचे दिसून येत नाही. शेतकऱ्यांच्या हितासाठी उक्त पध्दतीने कार्यतत्पर असणारी जिल्हा परिषद, रायगड ही राज्यातील एकमेव जिल्हा परिषद आसावी. समिती अशी शिफारस करते की, सदर प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रलंबित असलेला भूसंपादनाच्या प्रस्तावास लवकरात लवकर मान्यता देण्यात येवून संबंधित शेतकऱ्यांना संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला तात्काळ देण्यात यावा तसेच कोणत्याही

मान्यतेशिवाय पाझर तलावाचे काम करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात यावी. तसेच ठेकेदाराने तोडलेली झाडे ताब्यात न घेणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याविरुध्द व ठेकेदाराकडून उक्त सुमारे ५.५० लाख वसुलीची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.

परिशिष्ट
समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

सोमवार दिनांक ५ मार्च, २०१२

स्थळ :- जिल्हा परिषद सभागृह (अलिबाग) जि. रायगड

उपस्थिती

१. श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.

३. श्री. माधवराव पवार, वि.स.स.

४. श्री. हणमंतराव पाटील-बेट मोगरेकर, वि.स.स.

५. श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

६. श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

७. श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

८. श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स.

९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१०. डॉ. खुशाल बोपचे, वि.स.स.

११. श्री. सुरेश खाडे, वि.स.स.

१२. श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१३. श्री. अनिल राठोड, वि.स.स.

१४. श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१५. श्री. नितीन भोसले, वि.स.स.

१६. श्री. सुरेश नवले, वि.प.स.

१७. श्री. विक्रम काळे, वि.प.स

१८. श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

१९. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

श्री. ना.रा.थिटे, अवर सचिव

स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालय

श्री. र.बा.भागवत, संचालक

ग्रामविकास विभाग, मंत्रालय

श्रीमती ए.व्ही. वायुझडे, कक्ष अधिकारी

जिल्हा परिषद रायगड

श्री. अभिजित बांगर, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. जि.एम.चौधरी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. वसंत पाटील, प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि.यं

श्री. प्रकाश खोपकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. एस.आर.पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प./बां.क.)

श्री. ल.मा.पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री. एस.जी.माळे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

श्री. ए.एस.कोळी, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.)

श्री. बी.एस.पाटील, कृषि विकास अधिकारी

श्री. पी.आर.पवार, शिक्षणाधिकारी (प्रा)

श्री. जी.डी. जोगदंडे, शिक्षणाधिकारी (मा.)

श्री. रवींद्र कदम, समाज कल्याण अधिकारी

डॉ. पी.डी.बागुल, जिल्हा पशुसुवर्धन अधिकारी

श्री. डी.एल.साळावकर, प्रभारी गट विकास अधिकारी, पं.स. अलिबाग

श्री. पी.एम.साळुंखे, गट विकास अधिकारी, पं.स.पेण

श्रीमती एस.व्ही. पुंड, गट विकास अधिकारी, पं.स.पनवेल

श्री. के.बी.पाटील,गट विकास अधिकारी, पं.स.उरण

श्री. वाय.एम.प्रभे, गट विकास अधिकारी, पं.स.कर्जत

श्री. डी.एन.तेटगुरे, गट विकास अधिकारी, पं.स.खालापूर

श्री. व्ही.एम.म्हात्रे, गट विकास अधिकारी, पं.स.सुधागड-पाली

श्री. उन.टी.देसले, गट विकास अधिकारी पं.स.रोहा

श्री. सी.पी.पाटील, गट विकास अधिकारी पं.स.मुरुड

श्री. एम.डी.चिनके, गट विकास अधिकारी पं.स.माणगं ाव

श्री. बी.डी.इंगळे, गट विकास अधिकारी पं.स. तळा

श्री. एस.जी.धुत्रे, गट विकास अधिकारी पं.स. म्हसळा

श्रीमती एस.के.भगत, गट विकास अधिकारी पं.स. श्रीवर्धन

श्री. एम.डी.चिनके, प्रभारी गट विकास अधिकारी पं.स.महाड

श्री. बी.एन.जगताप, गट विकास अधिकारी पं.स.पोलादपूर व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील रायगड जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

बुधवार दिनांक ३ ऑक्टोबर, २०१२

स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

१. श्री. चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री. वैजनांथ शिंदे, वि.स.स.

४. श्री. दिलीप माने, वि.स.स.

५. श्री. भारत भालके, वि.स.स.

६. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

७. श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स.

८. श्री. दादाराव केचे, वि.स.स.

९. श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१०. श्री. संजय राठोड, वि.स.स.

११. श्री. सुर्यंकात दळवी, वि.स.स.

१२. डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.

१३. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. श्री. भा.ना.कांबळे, सह सचिव

२. श्री. गंगाधर कोहळे, उप सचिव

३. सौ.मेघना तळेकर, उप सचिव

४. श्री. ना.रा.थिटे, अवर सचिव

स्थानिक निधी लेखा परीक्षा, महाराष्ट्र राज्य

श्री. के.एम.विधाते, संचालक

विभागीय प्रतिनिधी

श्री. जे.एस.सहारिया, उप्पर मुख्य सचिव (मदत कार्य व पुनर्वसन) अतिरिक्त कार्याभार, उच्च व तंत्रशिक्षण विभाग

श्री. प्रवीण परदेशी, प्रधान सचिव, (वने)

श्री. अलिन डिग्गीकर, प्रधान सचिव, पशु संवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभाग

डॉ.आर.पी.सागर, प्रधान सचिव, अदिवासी विकास विभाग

श्री. उज्जवल उके, प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग

श्री. व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, रोजगार हमी योजना व जल संधारण विभाग

श्री. एस.के.मुखर्जी, प्रधान सचिव, सा.बा.विभाग

श्रीमती. वल्सा नायर सिंह, सचिव, पर्यावरण विभाग

श्रीमती शैला, ए.उप सचिव आणि संचालक पाणी पुरवठा विभाग

श्री. आण्णासाहेब मिसाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रायगड,

श्री. कांतीलाल उमाप, उप सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग

डॉ. विजय बाविस्कर, डीडीएचएस, सार्वजनिक आरोग्य विभाग

श्री. गिरीश भालेराव, सह संचालक, रा.ग्रा.का.अ.रायगड जिल्हापरिषद

श्री. राधेश्याम मोपलवार, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००४-२००५ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अप्पर मुख्य सचिव, (मदत कार्य व पुनर्वसन) अतिरिक्त कार्याभार, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, प्रधान सचिव, वने, प्रधान सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, दुग्धविकास विभाग, प्रधान सचिव, अदिवासी विभाग, प्रधान सचिव महिला व बालकल्याण विभाग, प्रधान सचिव, रोजगार हमी योजना व जलसंधारण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव, पर्यावरण विभाग, उप सचिव आणि

संचालक पाणी पुरवठा विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रायगड, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, डीडीएसएस, सार्वजनिक आरोग्य विभाग, सह संचालक, रा.ग्रा.आ.अ. मुंबई, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रायगड, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची साक्ष घेतली.

दिनांक - १७ डिसेंबर, २०१२
स्थळ : विधान भवन, नागपूर
उपस्थिती

समिती प्रमुख

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.
३. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
४. श्री.दादाराव केचे, वि.स.स.
५. श्री.जयकुमार रावल, वि.स.स.
६. श्री.संजय (बंडू) जाधव, वि.स.स.
७. श्री.दिपक साळुंखे, वि.प.स.
८. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

निमंत्रीत

९. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव
श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त

समितीने बैठकीत समितीच्या अकराव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणासह संमत केले.